महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरूवार, दि. १५ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ६७ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

* भारतीय लष्कर स्थापना दिवस

१५६४ : खगोलशास्त्रज्ञ गॅलिलिओ यांचा जन्म दिवस.
१७६१ : पानिपतचे तिसरे युध्द संपले.
१९१९ : छत्रपती शाहू महाराजांनी स्पृश्य-अस्पृश्यांना एकत्रित शिक्षण व्यवस्था सुरू केली.
१९०५ : माजी पंतप्रधान गुरजारीलाल नंदा यांचे निधन

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ८३,३८२.७१ | -२४४.९८(०.२९%) |
| डॉलर | ₹ ९०.२४ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १४ |
| दिल्ली | १८ | ०६ |
| मुंबई | ३२ | १७ |
| नागपूर | २९ | १५ |
| पुणे | ३० | ११ |

**सुविचार**

आत्मविश्वास हा यशाचा मूलमंत्र आहे. स्वतःवर विश्वास ठेवा, तुमचे स्वप्न साकार होतील.

**सुर्योदय - सुर्यास्त**
स.-७:०७ संध्या-६:०७

**सोने - चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४४,०००/- २,९०,०००/-

**केळी भाव**
नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

## थोडक्यात

### रोहितचा आशियात विराट पराक्रम!

**नवी दिल्ली ।** न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात रोहित शर्माने एक खास कामगिरी केली. रोहित या सामन्यात मोठी खेळी करू शकला नसला, तरी त्याने आशिया खंडात फलंदाजी करताना वनडेत ७००० धावांचा टप्पा ओलांडला आहे. हा टप्पा गाठणारा तो सातवा आशियाई फलंदाज ठरला आहे. सर्वाधिक धावा करणाऱ्या भारतीयांच्या यादीत रोहितने आता धोनीच्या विक्रमाला आव्हान दिले आहे. धोनीच्या नावावर आशियामध्ये ७१०३ धावा आहेत, तर रोहितच्या नावावर आता ७०१९ धावा झाल्या आहेत.

# मुंबईत मोठा राडा! ठाकरे-शिंदे गटाच्या शिवसैनिकांची हाणामारी

## घाटकोपरमध्ये पैसे वाटपाच्या आरोपातून दोन्ही गट आले आमनेसामने

वृत्तसंस्था । मुंबई

**येथील महापालिका निवडणुकीच्या मतदानासाठी आता अवघा एक दिवस शिल्लक राहिला आहे. मतदानाच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहरासह उपनगरांमध्ये राजकीय वातावरण चांगलंच तापलं असून, शिवसेनेच्या दोन्ही गटांकडून जोरदार तयारी सुरू आहे. मात्र, मतदानाच्या आदल्या दिवशीच घाटकोपरमध्ये मोठा गोंधळ उडाल्याने राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे.**



घाटकोपर परिसरात शिंदे गटाकडून पैसे वाटप होत असल्याचा आरोप करत ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी आक्षेप घेतला. याच मुद्द्यावरून दोन्ही गटांतील कार्यकर्ते आमनेसामने आले आणि वादाचे रूपांतर थेट हाणामारीत झाले. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

**शिंदे गटावर गुन्हे दाखल**

या प्रकरणी पोलिसांनी हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. घटनेनंतर शिंदे गटाच्या काही कार्यकर्त्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मात्र, या घटनेबाबत शिंदे गटाचे माजी नगरसेवक हारुन खान यांनी ठाकरे गटावर गंभीर आरोप केले आहेत.

हारुन खान यांनी आरोप करत म्हटले आहे की, ठाकरे गटाचे पदाधिकारी इम्रान शेख यांनी बाहेरून गुंड आणले होते. या लोकांवर गंभीर गुन्हे दाखल असून हत्येप्रकरणातही त्यांचा सहभाग आहे. इम्रान शेख यांचे गुंडांसोबतचे फोटोही उपलब्ध आहेत. कालची संपूर्ण घटना त्यांनीच घडवून आणली आहे.

**ठाकरे गटाचे प्रत्युत्तर**

शिंदे गटाच्या आरोपांना ठाकरे गटाचे पदाधिकारी इम्रान शेख यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. ते म्हणाले, आमच्यावर करण्यात आलेले सर्व आरोप पूर्णपणे खोटे आहेत. उलट शिंदे गटाचे हारुन खान परिसरातील नागरिकांना धमकावत आहेत. 'आम्हाला मतदान केलं नाही तर घर पाडू, पाणी तोडू' अशा धमक्या दिल्या जात आहेत.दोन्ही गटांनी एकमेकांवर गंभीर आरोप केल्याने हा (पान २ वर)

### अहिल्यानगरमध्ये भाजप-शिवसेना कार्यकर्त्यांत तुफान हाणामारी; ५ जखमीं, ४ जण अटकेत

**अहिल्यानगर ।** महापालिका निवडणुकीच्या वादातून शहराच्याआहे कल्याण रस्त्यावरील सुयोग पार्क येथे प्रभाग १५ मधील शिवसेना (शिंदे गट) व भाजप उमेदवारांचे कुटुंब व समर्थकांत जोरदाचे हाणामारी झाली. यासंदर्भात कोतवाली पोलिस ठाण्यात परस्परविरोधी फिर्यादीवरून २० ते २५ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या घटनेत ५ जण जखमी झाले तर पोलिसांनी चार जणांना अटक केली आहे. या घटनेवरून दोन्ही बाजूंच्या नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोप रंगले आहेत. प्रभाग (पान २ वर)

### वसई विरार शहरात पैशांचा पाऊस

**वसई विरार** शहरात मतदानाच्या दोन दिवस आधी राजकीय पक्षांकडून पैशाची उधळण केली जात आहे. एकीकडे मंगळवारी नालासोपाऱ्यात समोर आलेले पैसे वाटपाचे प्रकरण ताजे असताना आता वसईतही पैसे वाटप केले जात असल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. महापालिका निवडणुकीच्या काळात वसई विरार शहरात पैशांचा पूर येणार असल्याच्या चर्चा विविध ठिकाणी रंगल्या होत्या. प्रचारकाळात मतदारांना लक्ष्मीचे दर्शन घडवून स्वतःकडे वळवण्याचा प्रयत्न उमेदवारांकडून केला जाणारा असल्याचे म्हटले जात होते. तर शहरातील पूर्व पट्टा, आदिवासी पाडे, झोपडपट्ट्या या ठिकाणी पूर्वीपासूनच नागरिकांना जेवण, पैसे, भेटवस्तूंचे वाटप केले जात असल्याचा दावा अनेकांकडून केला जात होता. तर याच चर्चांच्या दरम्यान आता वसई विरार शहरात पैसे वाटपाची एकामागून एक प्रकरणे समोर येऊ लागली आहेत.मंगळवारी रात्री वसई पूर्वेतील वसई फाटा येथे पैसे वाटप केला जात असल्याचा प्रकार बहुजन विकास आघाडी आणि मनसे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उघडकीस आणला.

# भोसरी भूखंडप्रकरणी खडसेंवर आरोप निश्चित?

प्रतिनिधी । मुंबई



**भोसरी एमआयडीसी भूखंड घोटाळा प्रकरणात माजी महसूलमंत्री एकनाथ खडसे यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणात विशेष न्यायालयाने दोषारोप निश्चितीच्या प्रक्रियेला स्थगिती द्यावी, अशी विनंती खडसे यांच्याकडून करण्यात आली होती. मात्र, उच्च न्यायालयाने ही मागणी स्पष्ट शब्दांत फेटाळून लावत कोणतीही अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिला आहे.**

न्यायालयाने आपल्या आदेशात याचिकेतील विलंबाकडे विशेष लक्ष वेधले. दोषारोप निश्चितीची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी याचिका दाखल करण्यात उशीर झाल्याचे नमूद करत, अशा परिस्थितीत हस्तक्षेप करणे योग्य नसल्याचे मत न्यायालयाने व्यक्त केले. त्यामुळे विशेष न्यायालयाच्या कार्यवाहीस अडथळा आणण्यास न्यायालयाने नकार दिला आहे.

या निर्णयानंतर आता येत्या १६ जानेवारी रोजी विशेष न्यायालयात एकनाथ खडसे, त्यांची पत्नी मंदाकिनी खडसे तसेच जावई गिरीश चौधरी यांच्याविरोधात औपचारिकरित्या आरोप निश्चित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### प्रशासनिक नियमांचे मोठ्याप्रमाणावर उल्लंघन झाल्याचा दावा...

भोसरी येथील एमआयडीसी परिसरातील कथित भूखंड घोटाळा प्रकरण गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. या प्रकरणात माजी महसूलमंत्री एकनाथ खडसे, त्यांची पत्नी मंदाकिनी खडसे आणि जावई गिरीश चौधरी यांच्यावर गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत. प्रकरणात आर्थिक आणि प्रशासनिक नियमांचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन झाल्याचा दावा करण्यात आला असून, त्यामुळे या प्रकरणाचे महत्व फक्त कायदेशीरच नव्हे तर राजकीय दृष्टिकोनातूनही अधोरेखित झाले आहे.

आरोप निश्चित झाल्यानंतर या प्रकरणाच्या सुनावणीला वेग येण्याची शक्यता असून, खडसे यांच्यासाठी ही बाब कायदेशीरदृष्ट्या महत्त्वाची ठरणार आहे.

### भाजपच्या पायाखालची वाळू घसरली?

# धुळ्यात शिंदे गटाचे उमेदवार ऋषिकेश पाटलांच्या घरावर हल्ला

प्रतिनिधी । धुळे

**महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उद्या (दि.१५) मतदान होणार असतानाच आज मतदानाच्या आदल्या दिवशी शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. ऋषिकेश पाटील यांच्या घरावर अचानक दगडफेक करण्यात आली असून, घरासमोर ठेवलेल्या खुर्च्या व साहित्याची मोठ्या प्रमाणात तोडफोड करण्यात आल्याचे सांगण्यात येते. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मतदानाच्या आदल्या दिवशीच ही घटना घडल्याने निवडणूक प्रक्रियेवर परिणाम होऊ नये, यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे.**



या घटनेनंतर शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख मनोज मोरे यांनी गंभीर आरोप केले आहेत. दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने भाजपच्या उमेदवारासह काही गुंड प्रवृत्तीच्या कार्यकर्त्यांनी हा हल्ला केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. भाजपच्या उमेदवार प्रभावती शिंदे यांचे पती विलास शिंदे यांनीच हल्ला केल्याचा दावा मनोज मोरे यांनी केला आहे. मात्र, या आरोपांबाबत भाजपकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. घटनेची माहिती मिळताच आमदार मंजुळा गावीत या घटनास्थळी पोहोचल्या आणि आवश्यक ती माहिती त्यांनी घेतली.

धुळे शहर पोलीस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचारीही घटनास्थळी दाखल झाल्यावर पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत परिसरात बंदोबस्त वाढवला आहे. घटनेची पाहणी करून पंचनामा करण्यात आला आहे. प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदविण्याचे काम सुरू आहे. या हल्ल्याप्रकरणी (पान २ वर)

### पाकमधून १० लाख अफगाणी मायदेशी परतले

**पेशावर ।** गेल्या वर्षी एप्रिल महिन्यापासून पाकिस्तानमधून तब्बल १० लाख अफगाणी नागरिक मायदेशी परतले आहेत, असे पाकिस्तानमधील अधिकृत डाटावरून उघड झाले आहे. ही अधिकृत आकडेवारी बुधवारी प्रसिद्ध करण्यात आली. पाकिस्तानमधून अफगाणी शरणार्थ्यांना मायदेशी परत पाठवण्याची मोहिम २०२३ पासून सुरू झाली आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये सरकारने बेकायदेशीर परदेशी लोकांच्या स्वदेशी परतीची योजना सुरू केली, त्यामुळे अफगाणिस्तानातील लोक मोठ्या प्रमाणात परतले.

# ड्रग्ज पेडलरची क्लिप दाखवल्याच्या रागातून ना.गिरीश महाजनांचा ताफा अडवला

## बाप-लेकासह एका महिलेवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी । नाशिक

**राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्या सभेदरम्यान आणि सभेनंतर नाशिकच्या सिडको भागात मोठा राजकीय ड्रामा पाहायला मिळाला. सभेत दाखवण्यात आलेल्या एका कथित व्हिडिओ क्लिपचा जाब विचारत मंत्री महाजन यांचा ताफा अडवण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी बाप-लेकासह एका महिलेवर अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे नाशिकच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.**



सोमवारी, १२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी नाशिकमधील सिडको भागातील शिवाजी चौक येथे मंत्री गिरीश महाजन यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये बोलताना महाजन यांनी नेहमीच्या आक्रमक शैलीत विरोधकांवर टीकास्त्र सोडले. भाषणादरम्यान त्यांनी काही ड्रग्ज पेडलर्ससोबतची एक व्हिडिओ क्लिप जाहीररीत्या दाखवली आणि विरोधकांचे ड्रग्ज माफियांशी संबंध असल्याचा खळबळजनक आरोप केला. महाजन यांच्या या आरोपांमुळे सभेत एकच खळबळ उडाली होती.

**सभेनंतर ताफा अडवण्याचा प्रयत्न**

सभा संपल्यानंतर साडेपाच-सहाच्या सुमारास मंत्री गिरीश महाजन आपल्या (पान २ वर)

# भारतीयांना ५५ देशांत व्हिसाशिवाय फिरता येणार

प्रतिनिधी । नवी दिल्ली

**भारतीय पासपोर्ट धारकांसाठी २०२६ हे वर्ष मोठी आनंदाची बातमी घेऊन आले आहे. हेनले पासपोर्ट इंडेक्स २०२६ च्या ताज्या अहवालानुसार भारतीय पासपोर्टच्या क्रमवारीत मोठी सुधारणा झाली असून भारत आता ८० व्या स्थानावर पोहोचला आहे. भारताने गेल्या वर्षीच्या तुलनेत पाच पायऱ्यांची मोठी झेप घेतली असून आता भारतीय नागरिकांना जगातील ५५ देशांमध्ये व्हिसा-फ्री किंवा व्हिसा-ऑन-अरायव्हल सुविधेद्वारे प्रवास करता येणार आहे.**


भारताची ही प्रगती देशाच्या मजबूत होत असलेल्या आंतरराष्ट्रीय संबंधांचे प्रतीक मानली जात आहे. या जागतिक क्रमवारीत सिंगापूर १९२ देशांच्या सुविधेसह पहिल्या स्थानावर आहे, तर जपान आणि दक्षिण कोरिया दुसऱ्या स्थानी आहेत. भारताने आपल्या शेजारील देशांच्या तुलनेत मोठी आघाडी घेतली असून पाकिस्तान ९८ व्या तर बांगलादेश ९५ व्या क्रमांकावर फेकला गेला आहे. भारतीय पर्यटकांमध्ये अत्यंत लोकप्रिय असलेले थायलंड, मलेशिया आणि मॉरिशस यांसारख्या देशांनी भारतीय पर्यटकांना व्हिसाच्या कटकटीतून मुक्त केले आहे. यामुळे आता कोणत्याही पूर्व नियोजनाशिवाय केवळ पासपोर्ट घेऊन या देशांची सफर करणे शक्य होणार आहे.

# इराणमधील आंदोलनात अडीच हजारांहून अधिक मृत्यू

## परिस्थिती चिघळली, भारतीयांना तत्काळ इराण सोडण्याचे आवाहन

वृत्तसंस्था । तेहरान

**इराणमधील भारतीयांना तात्काळ इराण सोडण्याचे आवाहन भारतीय दूतावासाने केले आहे. भारतीय विद्यार्थी, पर्यटक तसेच व्यावसायिकांनी तात्काळ इराणमधून बाहेर पडावे. तसेच आंदोलन सुरू असलेल्या ठिकाणांहून बाहेर पडताना विशेष काळजी घ्यावी असे आवाहन भारतीय दूतावासाने केले आहे.**




इराणमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाने हिंसक वळण घेतले आहे. आंदोलनात अडीच हजारांहून अधिक जणांचा बळी गेला आहे. इराणच्या सुरक्षा दलाने आंदोलन मोडून काढण्यासाठी आंदोलकांवर हिंसात्मक कारवाई केल्याचे वृत्त आहे. तसेच हजारो आंदोलकांना अटक करण्यात आली आहे. इराणमध्ये परिस्थिती चिघळली असून संयुक्त राष्ट्रसंघाने इराणला आंदोलकांविरोधात सुरू असलेली हिंसा थांबवण्याचे आवाहन केले आहे.

आंदोलकांचे समर्थन मिळत असलेल्या रझा पहलवी यांनी आज इराणमधील आंदोलकांना लढा सुरू ठेवण्याचे आवाहन केले. अमेरिकेकडून तुम्हाला मिळणारी मदत तुमच्यापर्यंत लवकरच पोहोचेल या डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्याचा पहलवी यांनी पुनरूच्चार केला. दरम्यान, अमेरिकेने इराण बरोबर सुरू असलेली चर्चा पूर्णपणे थांबवल्याचे म्हटले आहे. आंदोलकांविरोधात हिंसक कारवाई केल्यास अमेरिका थेट हस्तक्षेप करेल, असा इशारा ट्रम्प यांनी दिला होता. इराणवर लष्करी कारवाई, कठोर कारवाई करण्याचा विचार करत असल्याचे ट्रम्प काल (मंगळवार) म्हणाले होते. या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार इराणमध्ये २५७१ जणांचा आंदोलनात मृत्यू झाला आहे.

इराणमध्ये हजारो आंदोलकांना अटक करण्यात आली आहे. त्यातच इराणचे कायदेप्रमुख गुलामहुसेन मोहसेनी-एजेई यांनी तुरूंगातील आंदोलकांना लवकरात लवकर शिक्षा द्यावी व त्याची अंमलबजावणी करावी, असे आवाहन केले आहे. आपल्याला जे काही करायचे आहे ते लवकर करावे लागेल, उशीर केला तर त्याचा परिणाम होणार नाही, असे कायदेप्रमुखांनी म्हटले आहे. इराणमधील (पान २ वर)

### ..तर इराण अमेरिकेच्या लष्करी तळांवर हल्ला करणार

इराणने आज (बुधवारी) आजूबाजूच्या देशांना इशारा दिला आहे. अमेरिकेने इराणवर हल्ला केला तर आजूबाजूच्या देशांमधील अमेरिकेच्या लष्करी तळांवर हल्ला केला जाईल, असा इशारा इराणने दिला. रॉयटर्सने याबाबत वृत्त दिले.

# जळगावात २९ लाखांची रोकड, ८० ग्रॅम सोने, ३ किलो चांदी जप्त



वृत्तसंस्था । जळगाव

**महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या चारही बाजुला स्थिर सर्व्हेक्षण पथके तैनात करण्यात आली आहेत. त्यापैकी एका पथकाने ममुराबाद रस्त्यावरील चौकीवर मोठी कारवाई केली आहे. तपासणीदरम्यान एका कारमधून सुमारे २९ लाखांची रोख रक्कम तसेच ८० ग्रॅम सोने आणि ३ किलो चांदी जप्त करण्यात आली आहे.**

ऐन निवडणुकीच्या धामधूमीत जळगाव जिल्ह्यात पोलिसांनी मोठी कारवाई करत संशयास्पद रोकड व सोन्या-चांदीचा मुद्देमाल जप्त केल्याने एकच खळबळ उडाली आहे. बऱ्हाणपूरहून जळगावमधील सुवर्ण बाजारपेठेत हा मुद्देमाल (पान २ वर)

# संपादकीय

## बिनचेहऱ्याचे लुटारू

लुटमारीचे प्रकार कायमच चालत आले आहेत. सर्वसामान्यांना थेट फटका देणारे गुन्हे म्हणून पाकिटमारी किंवा गळ्यातली चेन लांबवणे हे प्रकार सुपरिचित आहेत. यात तुम्ही तुमच्यासोबत जी काही रोकड अथवा सोने बाळगत आहात त्यालाच धोका असतो. बँकांमधील अथवा घरातील रक्कम आणि अन्य ऐवज सुरक्षित असतो. नंतर घरातला ऐवजही सुरक्षित नसल्याचे सिद्ध झाले असले तरी बँकांमधील ऐवज मात्र सुरक्षित होता आणि आहे असे आजही मानले जाते. प्रगती जशी होत गेली तसे व्यवहारांचेही स्वरूप बदलत गेले. मोबाइलच्या एका क्लिकवर घरात बसून कोणत्याही वेळेत आर्थिक व्यवहार करता येतात. जसे व्यवहारांचे स्वरूप बदलले तसे गुन्ह्यांचेही स्वरूप बदलले. त्यामुळे बँकेतील ऐवजही सुरक्षित नसल्याचे आता स्पष्ट झाले. गुन्हेगारीच्या या वाढत्या जाळ्यात डिजिटल अरेस्ट नावाचा एक नवीन प्रकार सगळ्यांत मोठे आव्हान म्हणून समोर आला आहे. प्रत्येक समस्येचा मुकाबला करण्यासाठी काही उपाय केलेले असतात. डिजिटल अरेस्टच्या बाबतीत उपलब्ध असलेले सर्व उपाय खुजे किंवा कुचकामी ठरत असल्याचे दिसते. सायबर गुन्हेगार लूट करण्यासाठी रोज नवनवीन प्रकार अवलंबत आहेत. सुरुवातीला दुर्मिळात दुर्मिळ म्हणता येऊ शकणारा डिजिटल अरेस्टचा नामक गुन्हा पाहता पाहता आता अजगरासारखे सगळेच गिळंकृत करायला निघाला आहे. यातील सगळ्यांत धोकादायक बाब म्हणजे याच्या माध्यमातून जी लूट केली जाते त्यात तुम्हाला स्वत:ला गुन्हेगाराला तुमची कमाई सोपवावी लागत असून बहुतांश प्रकरणात लुटणाऱ्यांचा चेहराही तुम्हाला दिसत नाही. व्हॉटसअॅप, व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून तुम्हाला धमकावले जाते. तुमच्या कथित काळ्या कृत्याची भीती घातली जाते आणि धमकावले जाते. गुन्हेगार स्वत:ला पोलीस असल्याचे भासवतो आणि लोक त्याला बळी पडतात. यात कोणते संमोहन नसते, असते ती केवळ भीती. डिजिटल अरेस्टच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे तीन हजार कोटी रुपये गुन्हेगारांनी लुटले असल्याचे सीबीआयने म्हटले आहे. त्यामुळे खुद्द सर्वोच्च न्यायालयालाच याची दखल घ्यावी लागली.

# मतदानापूर्वी जळगाव पोलीस ॲक्शन मोडमध्ये

## • मतदानाच्या पूर्वसंध्येला संवेदनशील भागांची स्वत:पोलिस अधीक्षकांनी केली पाहणी

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव महानगरपालिका निवडणुकीसाठी उद्या, गुरुवारी १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर शहरात तणावमुक्त आणि शांततामय वातावरण राहावे, यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी स्वत: रस्त्यावर उतरून सुरक्षा व्यवस्थेचे सूक्ष्म नियोजन केले आहे.**



मतदानाच्या पूर्वसंध्येला बुधवारी १४ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता त्यांनी शहरातील विविध संवेदनशील परिसरांना भेटी देऊन तिथल्या बंदोबस्ताची प्रत्यक्ष पाहणी केली.डॉ. महेश्वर रेड्डी यांनी संवेदनशील भागातील मतदान केंद्रांवर जाऊन तिथे लावण्यात आलेले बॅरिकेट्स, पोलिसांची उपस्थिती आणि सुरक्षेच्या उपाययोजनांचा आढावा घेतला. पोलीस कर्मचारी वेळेत आपापल्या पॉईंटवर पोहोचले आहेत की नाही, याची खातरजमा त्यांनी स्वतः केली.

यावेळी त्यांनी स्थानिक अधिकाऱ्यांना सूचना दिल्या की, मतदानाच्या दिवशी कोणत्याही प्रकारचा गोंधळ किंवा गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही.

शहरातील १६९ केंद्रांपैकी २२ उपद्रवी (संवेदनशील) केंद्रांची निवड करण्यात आली असून, तिथे विशेष लक्ष दिले जाणार आहे. या ठिकाणी अतिरिक्त पोलीस कुमक तैनात करण्यात आली आहे.

निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी संपूर्ण शहरात १,१५० पोलीस कर्मचारी, १,१४० होमगार्ड, एसआरपीएफच्या २ कंपन्या, ६ पोलीस उपअधीक्षक आणि ६० अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. पोलिसांनी केलेल्या या चोख नियोजनामुळे नागरिकांनी निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

डॉ. महेश्वर रेड्डी यांनी संवेदनशील भागातील मतदान केंद्रांवर जाऊन तिथे लावण्यात आलेले बॅरिकेट्स, पोलिसांची उपस्थिती आणि सुरक्षेच्या उपाययोजनांचा आढावा घेतला. पोलीस कर्मचारी वेळेत आपापल्या पॉईंटवर पोहोचले आहेत की नाही, याची खातरजमा त्यांनी स्वतः केली.मतदानाच्या दिवशी कोणत्याही प्रकारचा गोंधळ किंवा गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही.

# आधी मतदान मग सारे काम

प्रतिनिधी । जळगाव

मतदान सर्वात श्रेष्ठदान असून ते आपले प्रथम राष्ट्रीय कर्तव्यही आहे. त्यामुळे प्रत्येकाने आधी मतदान मग सारे काम या वाक्याप्रमाणे आधी मतदान करावे. शहरातील सर्व दिव्यांग बांधवांनी आपल्या व्यंगाला न जुमानता मतदान कार्यात स्वयंस्फूर्त सहभाग घेऊन सुदृढ समाजासमोर आदर्श निर्माण करावा, असे आवाहन मतदान जनजागृती कार्याचे डिस्ट्रिक्ट आयकॉन मुकुंद गोसावी यांनी केले. दिव्यांग समस्या केंद्र येथील मतदान जनजागृती कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

घटनेने मतदार राजा म्हणून मतदारांना सर्वोच्च पदवी बहाल केली असून याची जाणीव ठेवून मतदानाचा टक्का वाढवावा, असेही ते यावेळी म्हणाले.

# रणजी स्पर्धेसाठी नीरज जोशीची महाराष्ट्र संघात निवड

## • स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पुणे येथे रवाना; जैन स्पोर्ट्स अकॅडमीचा खेळाडू

प्रतिनिधी । जळगाव

**जैन स्पोर्ट्स अकॅडमी तसेच जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा खेळाडू नीरज चंद्रशेखर जोशी याची रणजी क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. त्याच्या निवडीबद्दल जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी कौतूक केले आहे.**



“ क्रिकेट स्पर्धांमध्ये राष्ट्रीयस्तरावर खेळाडूंना आपले प्रदर्शन करता यावे, यासाठी अनुभूती निवासी स्कूलमध्ये त्या दर्जाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्याचा पुरेपूर फायदा निरज जोशीने उचलला. त्याचे फलित म्हणजे महाराष्ट्र रणजी संघात त्याची झालेली निवड होय. निरजकडे आम्ही लहानपणापासूनच हरहुन्नरी खेळाडू म्हणून पाहत होतो व त्याने परिश्रमाने, जिद्दीने व चिकाटीने यश संपादन करुन महाराष्ट्र संघात स्थान पटकाविले. ही बाब जळगावकरांसाठी, जैन इरिगेशनसाठी व जिल्हा क्रिकेट असोसिएशनसाठी गौरवास्पद आहे.

**– अतुल जैन, अध्यक्ष, जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशन**

शहरातील बालाजी पेठ मधील रहिवाशी असलेला निरज जोशी अष्टपैलू खेळाडू आहे. डावखुरा गोलंदाज व आघाडीचा फलंदाज असलेला निरज मागील वर्षी महाराष्ट्राच्या १९ वर्षाखालील संघाचा कर्णधार होता, तर सय्यद मुश्ताक अली टी २० आणि यावर्षी २३ वर्षाखालील मुलांच्या संघाचा उप कर्णधारसुद्धा आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे आजच त्याला या स्पर्धेसाठी बोलवण्यात आले असून तो रणजी क्रिकेट स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पुणे येथे रवाना झाला आहे.

त्याच्या या निवडीबद्दल महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अॅपेक्स कौन्सीलचे सदस्य तथा जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अतुल जैन, सचिव अरविंद देशपांडे, जैन स्पोर्ट्स अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षिक सुयश बूरकुल, मुस्ताक अली तन्वीर अहमद व सर्वांनी त्याचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

# बालविश्वमध्ये मकर संक्रांती उत्साहात साजरी

प्रतिनिधी । जळगाव

**बालविश्व हॅपी हार्ट्स (पूर्व–प्राथमिक विभाग) येथे मकर संक्रांतीचा सण अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. चिमुकले विद्यार्थी पारंपरिक व रंगीबेरंगी पोशाखात सहभागी झाले होते, त्यामुळे शाळेच्या परिसरात सणाचा उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.**



लहान मुलांना समजेल अशा पद्धतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पतंगाशी संबंधित उपक्रम, कलात्मक कृती तसेच गोष्टींच्या माध्यमातून मकर संक्रांतीचे महत्त्व, नवीन सुरुवात, सकारात्मकता आणि आपुलकी समजावून सांगण्यात आले. शिक्षकांनी सोप्या व रंजक भाषेत सणाचे महत्त्व सांगितल्यामुळे मुलांनी आनंदात शिकण्याचा अनुभव घेतला. यावेळी एकमेकांशी वाटून खाणे व गोड बोलण्याचा संदेश देण्यात आला. चिमुकल्यांनी तिळगुळाचा आनंद घेत ‘तिळगुळ घ्या, गोड गोड बोला’ हा सणाचा संदेश आत्मसात केला.

मुलांच्या हास्याने व आकर्षक सजावटीने संपूर्ण परिसर आनंदमय झाला होता. हा कार्यक्रम पूर्व–प्राथमिक समन्वयक पल्लवी घारे व सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला.

अशा उपक्रमांमुळे मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते व भारतीय संस्कृतीची ओळख लहानपणापासूनच होते, असे शाळा व्यवस्थापनाने सांगितले.

# रुख्मिणी फाऊंडेशनतर्फे मतदारांसाठी हेल्पलाईन

## • १५ पदाधिकाऱ्यांची टीम सांभाळतेय काम

प्रतिनिधी । जळगाव

**महापालिका निवडणुकीत मतदान करणाऱ्या मतदारांना प्रभाग व मतदान केंद्राची माहिती मिळावी व सर्वांना मतदान करता यावे, यासाठी रुख्मिणी फांऊडेशनतर्फे मतदारांसाठी हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे.**



सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत मतदारांना कॉल करून माहीती घेता येणार आहे. त्यासाठी १५ पदाधिकारी कार्यरत असून ज्या व्यक्तीचा मोबाईल नंबर खाली असेल त्याला मोबाईल जोडला जातो त्यामुळे आवश्यक माहीती लगेच मिळण्यास मदत होते, अशी माहिती फाउंडेशनचे पंकज जैन यांनी दिली. या वेळी अध्यक्ष रविद्रसिंह राजपूत, पंकज जैन, विजय साखंला, ज्योती श्रीवास्तव, राजीव नायर, राजीव श्रॉफ, आशुतोष पंड्या व पदाधिकारी उपास्थित होते.

जास्तीत जास्त मतदारांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनी पतंग महोत्सवातून सेव्ह गर्ल चाईल्ड, लोकशाही मजबुत करण्याचा दिला संदेश

## • रायसोनी महाविद्यालयाचा उपक्रम; स्वत: विकसित केलेल्या उत्पादनांचे प्रदर्शन

प्रतिनिधी । जळगाव

**येथील जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालयात मकरसंक्रांतीच्या औचित्याने आज दि. १३ जानेवारी २०२६ रोजी ‘बिझनेस मेला’ व ‘पतंग महोत्सव’ या दोन उपक्रमांचे संयुक्त आयोजन करण्यात आले. या अभिनव उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या स्टार्टअप कल्पनांचे सादरीकरण करण्यासाठी व्यासपीठ मिळाले तसेच सेव्ह गर्ल चाईल्ड, लोकशाही मजबुत करा असा समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात आला.**



मेळाव्यात एमबीए विभागातील विद्यार्थ्यांच्या स्टार्टअप प्रोजेक्ट्सचे सादरीकरण करणारे एकूण ४० विविध स्टॉल लावण्यात आले होते. या उपक्रमाच्या माध्यमातून कॅम्पस मधील विद्यार्थ्यांच्या स्टार्टअप्सना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. या स्टॉलमध्ये विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः विकसित केलेल्या उत्पादनांचे प्रदर्शन मांडले होते. यामध्ये खाऊचे स्टॉल, जेवणाचे पदार्थ, सँडविच, नव्या पद्धतीची सरबते, ग्रिटिंग्ज, पुस्तके, आयटी सेवा, लाकडापासून तयार केलेल्या कलाकृती, बेकरी प्रोडक्ट्स तसेच विविध प्रकारचे इनोव्हेटिव्ह प्रोडक्ट्स यांचा समावेश होता. महाविद्यालयीन विद्यार्थी–विद्यार्थिनींसह प्राध्यापक व पालकांनी या कॅम्पस बाजाराला भेट देत विद्यार्थ्यांच्या स्टार्टअप उपक्रमांचे कौतुक केले. याच वेळी मकरसंक्रांतीनिमित्त आयोजित पतंग महोत्सवात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करत पतंगावर विविध सकारात्मक, सामाजिक व प्रेरणादायी संदेश लिहून समाजप्रबोधन केले. सेव्ह गर्ल चाईल्ड, मतदान करा, मुलगी शिकली, प्रगती झाली, लोकशाही मजबूत करा अशा स्लोगन्समुळे या उपक्रमाला सामाजिक जाणीवेची जोड मिळाली. यावेळी बोलतांना संचालिका प्रा. डॉ. प्रिती अग्रवाल यांनी, आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता नवकल्पना, सर्जनशीलता व उद्योजकतेकडे वळणे अत्यंत आवश्यक आहे. महाविद्यालयीन जीवनातच स्टार्टअप संकल्पनांना योग्य व्यासपीठ, मार्गदर्शन व संधी मिळाल्यास त्यातून यशस्वी उद्योजक घडू शकतात, असे सांगितले.

# पान १ वरुन

पान १ वरुन

### मुंबईत मोठा राडा.....

वाद आणखी चिघळण्याची शक्यता आहे. मतदानाच्या तोंडावर घडलेल्या या घटनेमुळे मुंबईतील राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत. आता या आरोप–प्रत्यारोपांवर शिंदे आणि ठाकरे गटाकडून पुढे काय भूमिका घेतली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### अहिल्यानगरमध्ये भाजप–शिवसेना......

१५ मध्ये शिवसेनेच्या सुवर्णा जाधव व भाजपचे दत्तात्रय गाडळकर यांच्यात लढत होत आहेत. दोघे परस्परांचे नातलग असले तरी त्यांच्यातील राजकीय वाद विकोपाला गेल्याचे चित्र आहे. जाधव गटाकडून अभिषेक शंकर दळवी (वय २४, रा. काटवन खंडोबा रोड) यांच्या फिर्यादीनुसार ते व उमेदवार सुवर्णा जाधव यांचा मुलगा हिमांशू हे जखमी झाले आहेत. मध्यरात्री १२.३० च्या सुमारास दळवी हे पेट्रोल टाकण्यासाठी हिमांशु दत्ता जाधव (रा. टिळक रस्ता) याला घेऊन कल्याण रस्त्यावरील पेट्रोलपंपाकडे जात असताना सुयोग पार्क येथे त्यांना अडवण्यात आले. त्यांनी अभिषेक व हिमांशु याला लाकडी दांडक्याने व लोखंडी गजाने मारहाण केली. या प्रकरणी ६ जणांसह इतर तीन अनोळखी व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गाडळकर गटाकडून दत्ता सोमनाथ गाडळकर (वय ४२, रा. सुयोगपार्क, कल्याण रोड) यांनी फिर्याद दिली आहे. ते रात्री घरी असताना त्यांचा भाचा यश याने फोन करून त्यांचा मुलगा राजवीर याला अंगावर गाडी घालून मारण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले. मुलगा त्यांच्याकडे आला असता सदर गाडी त्याचा पाठलाग करत होती. त्यानंतर सुयोग पार्कच्या मोकळ्या मैदानात गाडळकर व त्यांच्या वहिनीला मारहाण केली. तसेच, सिद्धांत देवकर, सिद्धेश झावरे, आर्यन एकाडे यांना चाकूने मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी ९ जणांसह इतर ५ ते ७ अनोळखी व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गाडळकर यांच्या फिर्यादीवरून दाखल गुन्ह्यात हेमंत उर्फ हिरा बाबासाहेब जाधव (वय ४१, रा. टिळकरोड), ऋषीकेश नितीन घुले (वय २८, रा. पाईपलाईन हडको), आदेश सुरेश जाधव (वय ३३, रा. टिळकरोड), अक्षय अरुण गाडळकर (वय ३२, रा. काटवन खंडोबा रोड, गाडळकर मळा) यांना अटक करण्यात आली आहे. त्यांना न्यायालयाने १७ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

खासदार नीलेश लंके यांनी जाधव कुटुंबीयांची भेट घेतली. भाजपकडून पोलिस बळाचा वापर विरोधी उमेदवारांवर केला जात आहे. चुकीच्या पद्धतीने गुन्हे दाखल केले जात आहेत. शिवसेनेचे अनिल शिंदे, आता दत्ता जाधव, तसेच महाविकास आघाडीच्या उमेदवारांबाबतही हेच घडले, असा आरोप खासदार लंके यांनी केला. तर, शिवसेनेचे प्रवक्ते संजीव भोर व जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले यांनी भाजप व राष्ट्रवादी शिवसेना उमेदवारांवर प्रशासनाच्या माध्यमातून दहशत निर्माण करत असल्याचा आरोप केला. भाजपचे माजी खासदार सुजय विखे यांनी विरोधकांवर गुंडगिरीचे आरोप करून गाडळकर कुटुंबाच्या घरात घुसून मारहाण केल्याचा आरोप केला आहे.

### धुळ्यात शिंदे गटाचे......

भाजपच्या उमेदवारासह संबंधित कार्यकर्त्यांवर तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी ठाम मागणी मनोज मोरे यांनी केली आहे. यासंदर्भात उमेदवार ऋषिकेश पाटील म्हणाले की, आम्ही कोणीही घरात नसताना माझ्या आंधळ्या आजी एकट्या असताना दगडफेक झाली आहे, उद्या आपण कसे निवडणूक लढवतात ते पाहून घेऊ, अशी दमदाटी करून हल्लेखोर निघून गेले आहेत. आमच्यासारख्या उमेदवाराची ही परिस्थिती असेल तर सर्वसामान्य लोकांची काय? याचा सगळ्यांनी विचार करण्याची वेळ आली आहे. या घटनेतून विरोधी पक्षाची पायाखालची वाळू घसरली आहे हे सिद्ध झाले आहे.

लोकशाही प्रक्रियेत हिंसाचार व दहशतीला कोणतेही स्थान नसून, प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, उद्या मतदान असल्याने शहरात तणावपूर्ण वातावरण असले तरी निवडणूक शांततेत पार पडावी, यासाठी पोलीस प्रशासनाकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात आले आहे.भाजपाचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्याशी संपर्क साधला असता यासंदर्भात अद्याप आपल्यापर्यंत कोणतीही माहिति पोहोचली नाही असे ते म्हणाले.

### ड्रग्ज पेडलरची क्लिप......

गाडीने रवाना होत होते. त्याचवेळी संशयित माधव पाटील (५२), त्यांचा मुलगा निशांत सुनील पाटील (२१) आणि एका महिलेने महाजन यांची गाडी अडवण्याचा प्रयत्न केला.

ना. महाजन, आमच्या मुलांची खोटी क्लिप दाखवून खोटा प्रचार का करताय?’ अशी विचारणा करत या तिघांनी मोठ्या प्रमाणावर आरडाओरड केली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे पोलिसांची मोठी धावपळ उडाली. महाजन यांचा ताफा निघून गेल्यानंतरही या संशयितांनी शिवीगाळ करत गोंधळ घातल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

पोलीस कारवाई

या प्रकरणी पोलीस शिपाई केशव ढगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरकारी कामात अडथळा आणणे, आरडाओरड करून शांतता भंग करणे आणि मंत्र्यांच्या ताफ्याला अटकाव करणे या कलमान्वये माधव पाटील, निशांत पाटील आणि संबंधित महिलेवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### जळगावात २९ लाखांची......

आणला जात असल्याचे कारमधील तिघांनी सांगितले असले, तरी त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारच्या अधिकृत पावत्या नसल्याने पोलिसांचा संशय बळावला.

भरारी पथकाने नियमित तपासणीदरम्यान एका संशयास्पद कारला थांबवून झडती घेतली असता, कारमधून मोठ्या प्रमाणात रोकड तसेच सोन्या–चांदीचा मुद्देमाल आढळून आला. कारमधील तिघांनी हा मुद्देमाल बऱ्हाणपूर येथून जळगावातील सराफा व्यावसायिकांकडे पोहोचविण्यात येत असल्याचे सांगितले. मात्र, या व्यवहारासंदर्भातील कोणत्याही पावत्या, बिल किंवा अधिकृत कागदपत्रे त्यांच्याकडे नसल्याचे तपासात स्पष्ट झाले.कारमध्ये बऱ्हाणपूर येथील राकेश दामोदरदास श्रॉफ, जयेश राकेश श्रॉफ आणि चालक नवीन भावसार हे तिघेच होते. स्थिर निरीक्षण पथकाने कार थांबवल्यानंतर आतील मुद्देमालाविषयी विचारणा केली. तेव्हा बऱ्हाणपूर येथून जळगावमध्ये सोन्याची शुद्धता तपासण्यासाठी व नवीन दागिने खरेदी करण्यासाठी रोख रक्कम आणि सोने, चांदी घेऊन जात असल्याचे तिघांनी सांगितले. तसेच सर्व मुद्देमाल बऱ्हाणपूर येथील एका सुवर्ण पेढीचे मालक दामोदरदास गोपालदास श्रॉफ यांच्या मालकीचा असल्याचे स्पष्ट केले.

### इराणमधील आंदोलनात......

मानवाधिकार कार्यकर्त्यांनी इराणमध्ये कैदेत असलेल्या आंदोलकांना फाशीची शिक्षा होण्याची शक्यता व्यक्त केली होती. त्यानंतर कायदेप्रमुख गुलामहुसेन मोहसेनी–एजेई यांनी विधान केले आहे. त्यामुळे इराणमध्ये आणखी आंदोलन पेटण्याची शक्यता आहे. दरम्यान, इराणने २००० हून अधिक जणांचा आंदोलनात मृत्यू झाल्याच्या बातमीला दुजोरा दिला आहे. अमेरिकास्थित या मानवाधिकार संघटनेने २५७१ जणांचा मृत्यू झाल्याचे म्हटले होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## थोडक्यात

### नायलॉन मांजाप्रकरणी गुन्हा दाखल

**धुळे ।** जिल्ह्यात पोलिसांनी धडक कारवाई करत नायलॉन मांजा विक्री व वापर प्रकरणी तीन वेगवेगळे गुन्हे दाखल केले असून सुमारे ३० हजार रुपयांचा नायलॉन मांजाचा मुद्देमाल जप्त केला आहे. दुचाकीने जातांना अज्ञात व्यक्तीने उडवलेल्या पतंगाचा नायलॉन दोरा चिमुकल्याच्या गळ्याभोवती अडकला. यात त्याला गंभीर दुखापत झाली. या प्रकरणी शिरपूर पोलिसात अज्ञात इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर एलसीबीच्या पथकाने साक्रीत कारवाई तरुणाकडून २७ हजाराचा नायलॉन मांजा जप्त केला. शिरपूर शहर पोलिसांनी २ हजाराचा नायलॉन मांजा व चक्री हस्तगत केली.

### शहादा येथे गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**शहादा ।** शहरातील श्रीराम कॉलनी परिसरात एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. वैभव प्रकाश कुलकर्णी (वय ३८), रा.श्रीराम कॉलनी, शहादा असे मयत तरुणाचे नाव आहे. याबाबतची खबर गणेश प्रकाश कुलकर्णी (वय ३६), रा.शहादा यांनी पोलीस ठाण्यात दिली. मिळालेल्या माहितीनुसार, वैभव कुलकर्णी यांनी त्यांच्या घराच्या छताला सिलिंगच्या कडीच्या दांड्याला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे आढळून आले. ही बाब लक्षात येताच नातेवाईक व नागरिकांनी तातडीने त्यांना खाली उतरवून ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

# धुळे मनपाच्या ३१६ उमेदवारांचे भवितव्य आज ईव्हीएममध्ये होणार बंद

## ५०७ केंद्रांवर होणार मतदान; ४ जागा बिनविरोध

प्रतिनिधी । धुळे

**धुळे महापालिकेच्या ७४ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू असून यापैकी ४ जागा बिनविरोध झाल्या आहेत. उर्वरित ७० जागांसाठी ३१६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. महापालिका क्षेत्रात एकूण ५०७ मतदान केंद्रांवर मतदान होणार असून, यासाठी सुमारे ३ हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर सरासरी ५ कर्मचारी कार्यरत राहणार आहेत.**




निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली प्रभागनिहाय मतदान यंत्रांमध्ये मत्तपत्रिका लावण्याचे काम पूर्ण झाले आहे. मतदान प्रक्रियेसाठी सर्व मतदान यंत्र सज्ज करण्यात आली असून, प्रत्येक यंत्रात नोटा बटन उपलब्ध आहे. मतदान यंत्रातील मतपत्रिकेत एका प्रभागातील चार भागांसाठी वेगवेगळे रंग देण्यात आले आहेत. अ भागासाठी पांढरा, ब साठी फिका गुलाबी, क साठी फिका पिवळा त्तर ड भागासाठी फिका निळा रंग निश्चित करण्यात आला आहे.एका यंत्रात १५ उमेदवार मतदान यंत्रात एका वेळी १५ उमेदवारांची नावे व नोट बटनाचा समावेश आहे, उमेदवारांची संख्या अधिक असल्यास अतिरिक्त मतदान यंत्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्वसाधारणपणे प्रत्येक मतदान केंद्रावर दोन मतदान यंत्रे व एक कंट्रोल युनिट असते. मात्र प्रभाग क्र. ८ मध्ये २३ उमेदवार असल्याने येथे ३ मतदान यत्रे व २ कंट्रोल युनिट ठेवण्यात येणार आहेत. उमेदवारांची संख्या व नोटासह आवश्यक बटनांची मर्यादा लक्षात घेऊन अतिरिक्त यंत्र देण्यात आले आहे.

### ➢ मतदान केंद्र परिसरात मोबाईल, छायाचित्रणावर बंदी प्रत्येक उमेदवारास केवळ दोन वाहनांचीच परवानगी

धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत मतदान व मतमोजणी प्रक्रिया भयमुक्त, निर्भय, शांततापूर्ण व पारदर्शक राहावी, यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कडक निर्बंध जाहीर करण्यात आले आहेत. मतदान केंद्राच्या आत मोबाईल, वायरलेस फोन नेण्यास मनाई. १०० मीटर परिसरात कर्मचारी व पोलीस वगळता मोबाईल वापरास बंदी. मतदान कक्षात कोणतेही छायाचित्रण,चित्रीकरण निषिद्ध. प्रसारमाध्यमांच्या प्रवेशिकेची पडताळणी आवश्यक असून मतदान कक्षाजवळ जाणे व थेट चित्रीकरणास मनाई करण्यात आली आहे. गर्दी टाळण्यासाठी गटागटाने प्रवेश द्यावा. उमेदवाराने मतदान केंद्रापासून १०० मीटर परिसरात कुठलाही प्रचार अथवा ओळख करून देवू नये. मतदान केंद्रात मर्यादित वेळ व संपूर्ण कालावधीत जास्तीत जास्त तीन वेळा प्रवेश दिला जाईल. मतदान केंद्रात,परिसरात प्रचार साहित्य निषिद्ध असून मतदारांची ने-आण करण्यासाठी वाहनांचा वापर करता येणार नाही. प्रत्येक उमेदवारास केवळ दोन वाहनांचीच परवानगी राहील. अत्यावश्यक सेवा व निवडणूक कामावरील वाहने वगळता शंभर मीटर परिसरात इतर वाहनांना प्रवेश नाही. शंभर मीटरच्या आत कोणतेही सहाय्य केंद्र नाही. बाहेर प्रत्येकी एकच केंद्र (१ टेबल, २ खुर्चा) नाव, चिन्ह, फोटो किंवा प्रचार साहित्य देण्यास मनाई. सूचनांचे उल्लंघन झाल्यास राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार व प्रचलित कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

# निवडणूक निरीक्षक, आयुक्तांनी केली मतदान केंद्रांवर पाहणी



**धुळे । महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी शहरातील एकूण ५०७ मतदान केंद्रांवर मतदान केंद्राध्यक्ष कर्मचारी तसेच आवश्यक ते साहित्य पोहोचलेले असून त्याबाबत निवडणूक निरीक्षक देवदत्त केकान व आयुक्त तथा निवडणूक अधिकारी नितीन कापडणीस यांनी शहरातील विविध मतदान केंद्रावर पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.**

# प्रजासत्ताकदिनी तळोद्यात सुशोभिकरणाची सामाजिक कार्यकर्त्यांनी केली मागणी

प्रतिनिधी । तळोदा

**प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून तळोदा शहरातील प्रमुख रस्ते, चौक व सार्वजनिक स्थळांचे तिरंगा, एल. ई.डी. स्ट्रीट लाईटद्वारे भव्य व सर्वांगीण सुशोभिकरण करण्यात यावे, तसेच तळोदा शहरातील धुळीची समस्या कायमस्वरूपी मिटून शहर धुळमुक्त व्हावे अशी जनहिताची मागणी शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी नगरपालिकेकडे केली आहे.**



मुख्याधिकारी विक्रम जगदाळे व नगराध्यक्षा भाग्यश्री योगेश चौधरी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रजासत्ताक दिनी शहरात तिरंगा, एल.ई. डी. स्ट्रीट लाईटच्या माध्यमातून शहराचे सौंदर्य अधिक खुलून दिसेल तसेच नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना देखिल बळकट होईल. यासाठी शहरातील मुख्य मार्ग, चौक, प्रशासकीय इमारती व सार्वजनिक स्थळे तिरंग्यात उजळल्यास तळोदा शहराची सकारात्मक प्रतिमा निर्माण होईल.

तसेच तळोदा शहर धुळीच्या विळख्यात सापडले असून धूळ-प्रदूषणामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व श्वसनविकाराने त्रस्त रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यातून मुक्ती मिळविण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना अंमलात आणावी. यासाठी आधुनिक मेक्निकल रोड स्विपर / धूळ नियंत्रक मशीन उपलब्ध करून दिल्यास रस्त्यांची नियमित व शास्त्रीय पद्धतीने स्वच्छता होईल. परिणामी हवेत उडणारी धूळ कमी होऊन, शहर स्वच्छ, आरोग्यदायी व पर्यावरणपूरक होण्यास मदत होईल. प्रशासनाने या तातडीनेनिर्णय घ्यावा, असे निवेदनात म्हटले आहे. निवेदन देताना सामाजिक कार्यकर्ते तुषार जोहरी, सचिन भोई व नीरज भोई उपस्थित होते.

# अपघात प्रतिबंधक उपकरणाला पारितोषिके; विज्ञान प्रदर्शनात श्री शिवाजी हायस्कूलचे यश

प्रतिनिधी । नवापूर

**नवापूर तालुका पंचायत समिती शिक्षण विभाग, तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा,नवापूर तालुकास्तरीय दर्शन, शैक्षणिक साहित्य, मुख्याध्यापक संघ तसेच शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा ढोंग सागाळी यांच्या संयुक्त विद्यमाने ४८ वे नवापूर तालुका विज्ञान व शैक्षणिक साहित्य प्रदर्शन उत्साहात पार पडले. या प्रदर्शनात तालुक्यातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक कल्पकता व संशोधन वृत्तीचे दर्शन घडवले.**



या विज्ञान प्रदर्शनात श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय नवापूर यांनी घवघवीत यश संपादन केले. उच्च प्राथमिक गटात इयत्ता ७वी अ मधील छत्रसाल राहुल साळुंखे याने मॅजिक टेबल या उपकरणासाठी द्वितीय क्रमांक मिळवला, माध्यमिक व उच्च माध्यमिक गटात इयत्ता ११ वी सायन्स मधील पुष्पक राजधर जाधव याने बहुपयोगी बूट या उपकरणासह तृतीय क्रमांक पटकावला. तसेच माध्यमिक आदिवासी राखीव गटात इयत्ता १० वी अ मधील पार्थ बजरंग गावित याने डुलकी येणाऱ्या चालकांमुळे होणारे अपघात टाळण्यासाठीचे उपकरण सादर करून प्रथम क्रमांक मिळविला. छत्रसाल साळुंखे यास शिक्षिका अर्चना एकनाथ बिरारी, पुष्पक जाधव यास प्रा. प्रशांत शरद बोरसे, पार्थ गावित यास शिक्षक निळकंठ सुखदेव बागुल, विज्ञान प्रमुख शोभा गिरासे, विकास पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचा शाळेतर्फे सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापिका कमल कोकणी, उपप्राचार्य राजेंद्र कुलकर्णी, उपमुख्याध्यापक ए.एन. सोनवणे, पर्यवेक्षक हरीश पाटील, पर्यवेक्षक जी.डी. सूर्यवंशी, पर्यवेक्षक ज्योती कलाल तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक व वैज्ञानिक परंपरेला नवी उंची मिळाली आहे. शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनामुळे आणि शाळेतील पोषक शैक्षणिक वातावरणामुळे हे यश शक्य झाले असल्याचे मत पालकांनी व्यक्त केले. भविष्यातही अशा स्पर्धांमधून विद्यार्थी नावीन्यपूर्ण संशोधन करून समाजोपयोगी उपक्रम सादर करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## शहादा पोलीस निरीक्षकपदी हेमंत पाटील

प्रतिनिधी । शहादा

शहादा येथील पोलीस निरीक्षकपदी हेमंत पाटील यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी आपला पदभार स्विकारला आहे. जिल्ह्यातील पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षकांचा जिल्ह्यांतर्गत प्रशासकीय बदल्यांचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांनी निर्गमित केले. त्यात नंदुरबार पोलीस ठाण्याचे प्रभारी निरीक्षक हेमंतकुमार पाटील यांची शहादा पोलीस ठाण्यात प्रभारी अधिकारी म्हणून तर शहाद्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक निलेश देसले यांची प्रभारी अधिकारी म्हणून नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली. तसेच नियंत्रण कक्षातील पोलीस उपनिरीक्षक रितेश नाना राऊत यांना अप्पर पोलीस अधीक्षक यांचे वाचक म्हणून अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

# धुळे महानगरपालिकेसाठी १६ ला मतमोजणी

प्रतिनिधी । धुळे

**धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक साठी मतमोजणी शुक्रवार, दि. १६ रोजी पार पडणार असून, सदर मतमोजणीसाठी कृषी उत्पन्न बाजार समिती, पारोळा रोड, धुळे येथे मतमोजणी होणार आहे.**

मतमोजणी प्रक्रिया सुरक्षित, पारदर्शक व शिस्तबद्ध रितीने पार पाडण्यासाठी मतमोजणी केंद्र परिसरात एकूण ०२ ठिकाणी प्रवेश व्यवस्था निश्चित करण्यात आली असून, प्रत्येक ठिकाणी प्रवेश, वाहन प्रवेश व मोबाईल, इलेक्ट्रॉनिक वस्तूंविषयी स्वतंत्र नियोजन करण्यात आले आहे.

प्रवेश फक्त अधिकृत ओळखपत्रधारकांनाच दिला जाणार आहे. उमेदवार व त्यांच्या मतमोजणी प्रतिनिधींना फक्त प्रवेशव्दारापर्यंत वाहनाने सोडण्यास परवानगी आहे. DFMD (Door Frame Metal Detector) द्वारे दोन टप्प्यांत तपासणी करण्यात येणार आहे.

मोबाईल, इलेक्ट्रॉनिक वस्तू, मतमोजणी केंद्राच्या आत मोबाईल व इलेक्ट्रॉनिक वस्तूंवर सक्त बंदी राहील. मतमोजणी केंद्राच्या आत फक्त आयुक्त, निवडणूक निरीक्षक, ठज/-ठज यांनाच मोबाईल वापरण्यास परवानगी राहील. उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांना कोणत्याही परिस्थितीत मोबाईल, इलेक्ट्रॉनिक वस्तू वापरण्यास परवानगी नसेल. जिल्हा माहिती अधिकारी यांच्या मार्फत देण्यात आलेल्या अधिकृत प्रवेशिका असलेल्या पत्रकारांसाठी स्वतंत्र पत्रकार कक्ष (Media Room). पत्रकारांना फक्त पत्रकार कक्षातच मोबाईल व इलेक्ट्रॉनिक साधने वापरण्याची मुभा राहील.

मतमोजणी कक्ष व स्ट्राँग रूम परिसरात पत्रकारांना प्रवेश दिला जाणार नाही.

मतमोजणीचा निकाल ऐकण्यासाठी आलेल्या नागरिकांसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ स्वतंत्र बाह्य व्यवस्था करण्यात आली आहे.

याठिकाणी कोणत्याही वाहनाला प्रवेश राहणार नाही. यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या समोरील बाजूस वरखेडी रोड कडे पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे. नागरिकांना मतमोजणी केंद्राच्या आत प्रवेश दिला जाणार नाही. सर्व उमेदवार, प्रतिनिधी, पत्रकार व नागरिकांनी प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे व मतमोजणी प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# शहादा पालिकेतील जन्म-मृत्यू विभागातील दस्तऐवज गहाळ

## सीसीटीव्ही फुटेज तपासून दोषींवर कारवाईचे नगराध्यक्ष अभिजीत पाटलांनी दिले आदेश

प्रतिनिधी । शहादा

**शहादा पालिकेच्या जन्ममृत्यू विभागातील सर्व दस्तऐवज अचानकपणे गहाळ झाल्याचा खळबळीचा प्रकार उघडकीस आला आहे नगरपालिकेच्या कोणत्याही प्रशासकीय अधिकारीची परवानगी न घेता काही इसमानी कर्मचाऱ्यांना जबरदस्ती करून हे दालन रिकामे केल्याने संबंधितांविरोधात कारवाई करण्याचे आदेश नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी मुख्याधिकारी साजिद पिंजारी यांना दिले आहेत.**




येथील नगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील नागरिकांच्या अतिशय महत्त्वाचे दस्तऐवज असलेल्या जन्ममृत्यू विभागामध्ये वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता दिवसाढवळ्या अज्ञात इसमांनी प्रवेश केला आहे. जन्म मृत्यूचे अतिशय महत्त्वाचे दस्तऐवज संबंधित खोलीत

नसल्याची प्राथमिक माहिती समोर आल्यानंतर लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी तात्काळ पालिका गाठत माहिती घेऊन पाहणी केली असता इथे पूर्ण खोली रिकामी होती. त्यात कोणतीही दस्तऐवज नव्हते याप्रकरणी लवकरात लवकर सीसीटीव्ही फुटेज पाहून जे कोणी दोषी असेल त्यांच्यावर कारवाई करण्याच्या इशारा त्यांनी दिला.

● पडलेल्या प्रकाराबाबत मला काहीही कल्पना नाही. महत्वाचे दस्तऐवज हलवण्याबाचत मी कोणत्याही स्वरूपाची कोणालाही परवानगी दिलेली नाही.
– साजिद पिंजारी,
मुख्याधिकारी, शहादा
सितखेडा आणि पळासखेडा

### ➢ पाहणीदरम्यान खोली आढळली रिकामी

**नगराध्यक्ष अभिजीत पाटील म्हणाले की, प्राथमिक माहिती मिळाल्यानंतर तात्काळ प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर संबंधित खोलीची पाहणी केल्यावर खोली रिकामी आढळली., या जन्ममृत्यू विभागांमध्ये शहरातील तसेच परिसरातील लोकांचा जन्माच्या, मृत्यू दाखलांची नोंद असते इथूनच सगळ्यांचे दाखले वितरीत होतात, या अतिशय महत्त्वाच्या दस्तऐवज असलेल्या खोली मधील कागदपत्रे अचानक दुसरीकडे कुठेतरी शिफ्ट केले असल्याचे सांगण्यात आले. परंतु महत्त्वाचे दस्तऐवज कुणालाही न विचारता परस्पर दुसरीकडे ठेवल्याने यात काही कागदपत्रे गहाळ झाल्यास जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान घडलेल्या घटनेबाबत पालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी साजिद पिंजारी यांनाही कल्पना नसल्याचे त्यांनी सांगितले. शिवाय तेथील जबाबदार अधिकाऱ्यांनाही याची कुठलीही कल्पना नसल्याने ही बाब गंभीर ठरते आहे.**

नगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमध्ये जर बेकायदेशीर रित्या कुठलीही परवानगी नसताना अतिशय महत्वाचे दस्तएवज परस्पर दुसरीकडे शिफ्ट करणे अतिशय गंभीर बाब आहे. मंगळवारी सकाळी या गोष्टीची मोठ्या स्तरावर चौकशी होऊन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येणार असून याच्यामध्ये प्रशासनातील अधिकारी जर कोणी याच्यामध्ये सहभागी असतील त्यांनी देखील बेकायदेशीर काम केले असेल अशा या सर्व बेकायदागीर कृत्य करणाऱ्या लोकांवर गुन्हे दाखल करू,
– अभिजीत पाटील,
लोकनियुक्त नगराध्यक्ष शहादा

# नवापूर पालिकेतर्फे खड्डे बुजविण्याच्या कामास सुरुवात

प्रतिनिधी । नवापूर

**येथील पालिकेत एकहाती सत्ता स्थापन झाल्यानंतर अवघ्या काही दिवसांत शहरातील विकासकामांना गती मिळू लागली आहे.**

शहराच्या जुन्या सीमा तपासणी नाका येथून ते पहिल्या महिला जिल्हा परिषद अध्यक्षा स्व. हेमलताताई यांच्या पुतळ्यापर्यंत असलेल्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामास नुकतीच सुरुवात करण्यात आली आहे. या कामाची पाहणी लोकनियुक्त नगराध्यक्ष जयवंत जाधव, उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे, नगरसेवक शिरीष प्रजापत, राजू आगळे, अलतमस खाटीक आदी मान्यवरांनी केली. यावेळी रस्त्याचे काम दर्जेदार व टिकाऊ पद्धतीने करण्याच्या स्पष्ट सूचना नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांनी संबंधित ठेकेदाराना दिल्या. मागील वर्षी पावसाचे प्रमाण अधिक असल्याने शहराच्या प्रवेशद्वारापासून मुख्य रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले होते.

त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर नगरपालिकेने तातडीने लक्ष घालून खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतल्याने शहरवासीयांनी समाधान व्यक्त केले आहे.

पालिका निवडणुकीदरम्यान दिलेली आश्वासने प्रत्यक्षात विकास कामाना सुरुवात झाली असून, येत्या काळात शहरात आणखी विविध विकासकामे मार्गी लागतील, असे मत नगराध्यक्ष जयवंत जाधव यांनी यावेळी व्यक्त केले आहे.

# चोपडा नगरपरिषदेच्या उपाध्यक्षपदी पंकज बोरोले यांची बिनविरोध निवड

## • तीन स्वीकृत सदस्यांचीही बिनविरोध नियुक्ती

प्रतिनिधी । चोपडा

**येथील नगरपरिषदेच्या उपाध्यक्षपदाची तसेच स्वीकृत सदस्यांची निवड करण्यासाठी बुधवार, दि. १४ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता नगरपरिषदेच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सर्वसाधारण सभा पार पडली. ही सभा पीठासीन अधिकारी तथा नगराध्यक्षा नम्रता सचिन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली.**

या सभेस नगरपरिषदेचे सर्व ३१ नगरसेवक, मुख्याधिकारी रामनिवास झंवर तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी उपाध्यक्षपदासाठी प्राप्त झालेल्या नामनिर्देशन प्रस्तावांचे वाचन करण्यात आले.



उपाध्यक्षपदासाठी पंकज सुरेश बोरोले यांचे दोन प्रस्ताव प्राप्त झाले होते. या प्रस्तावांना नगरसेवक योगेंद्र (पियुष) राजेंद्र चौधरी यांनी सूचक तर रमेश ग्यानोबा शिंदे व किशोर रघुनाथ चौधरी यांनी अनुमोदक म्हणून पाठिंबा दिला. उपाध्यक्षपदासाठी अन्य कोणताही उमेदवार नसल्याने पंकज बोरोले यांची बिनविरोध निवड झाल्याचे पीठासीन अधिकाऱ्यांनी जाहीर केले. त्यानंतर स्वीकृत सदस्य पदांसाठी नामनिर्देशन प्रस्ताव सादर करण्यात आले. त्यानुसार मोहम्मद हनिफ अब्दुल सत्तार, दिपक भगवंतराव पाटील व तिलकचंद मुलजी शाह यांची प्रत्येकी एक नामनिर्देशने वैध ठरवून तिन्ही उमेदवारांची बिनविरोध स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. सभेचे कामकाज दुपारी १.४७ वाजता खेळीमेळीच्या वातावरणात पूर्ण झाले. यावेळी नगराध्यक्षा नम्रता सचिन पाटील यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# नशिराबाद नगरपरिषदेच्या प्रथम उपनगराध्यक्षपदी पंकज महाजन बिनविरोध







प्रतिनिधी । नशिराबाद

**येथील नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवकांची काल दि. १३ रोजी नगराध्यक्ष योगेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत उपनगराध्यक्षपदी पदासाठी शिंदे सेनेचे पंकज महाजन यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तर स्वीकृत नगरसेवक पदासाठी भारतीय जनता पार्टीकडून प्रदीपा शिंदे गटाकडून संदीप (आबा) विष्णू पाटील यांची निवड जाहीर करण्यात आली.**

या दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकमेव अर्ज आल्याने व जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी मिळाल्याने दोघेही बिनविरोध निवडून आले. सभेचे कामकाज मुख्याधिकारी रवींद्र सोनवणे यांनी पाहिले. उपनगराध्यक्षांसह स्वीकृत नगरसेवक निवडीबद्दल पालकमंत्री ना.गुलाबराव पाटील यांनी भ्रमणध्वनीद्वारे अभिनंदन केले.

निवड प्रसंगी भारतीय जनता चौधरी, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रताप पाटील यांनी सुध्दा नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. त्याचप्रमाणे जि.प.चे माजी उपाध्यक्ष तथा नगरपरिषदेतील भाजप गटनेते नगरसेवक लालचंद पाटील, शिवसेना शिंदे गटाच्या गटनेत्या शैला व्यवहारे व नगराध्यक्ष योगेश पाटील यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार स्वीकृत नगरसेवकपदी प्रदीप बोढरे, संदीप पाटील यांची निवड करण्यात आला. सभेच्या सुरुवातीलाच मुख्याधिकारी रवींद्र सोनवणे यांनी सर्व नगरसेवकांचा सत्कार केला. या सभेस नगरसेवक विकास पाटील, कीर्तिकांत चौबे, चेतन बऱ्हाटे, मनोज पाटील, शेख असलमोद्दिन एजाजोद्दीन, कोमल नारखेडे, लीना महाजन, हिना बी मोरईस कासार, सय्यद वासीफ अली, सय्यद निसार अली, शाह हनीफा बी मोहम्म खलील, सुवर्णा महाजन, जनाबाई रंधे, शेख नसरीन बानो मुश्ताक, मोहम्मद इक्बाल शेख इब्राहीम, मण्यार कमरूनिसा सय्यद बिस्मिल्ला, मन्यार आसीफ शेख गनी शेख, भारताबाई धनगर व पदाधिकारी उपस्थित होते. निवडीनंतर भाजप-सेना युतीच्या कार्यकर्त्यांनी नगरपरिषद कार्यालयापासून शहरातील प्रमुख मार्गांवर ढोल-ताशांच्या गजरात जल्लोषपूर्ण मिरवणूक काढून विजयी आनंद साजरा केला.

# हिंदी सेवा मंडळाचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा

प्रतिनिधी । चोपडा

**येथील हिंदी सेवा मंडळचा अमृत महोत्सव दि.१३ रोजी साजरा करण्यात आला.**

यावेळी हिंदी सेवा मंडळाचे अध्यक्ष मिलिंद अग्रवाल, प्रमुख पाहुणे म्हणून सीओईपी टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी पुण्याचे कुलगुरु डॉ.एस.जे. भिरूड आणि मुख्य विभागीय रेल्वे प्रबंधक पुनीत अग्रवाल तसेच हिंदी सेवा मंडळाचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, माजी मुख्याध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. हिंदी सेवा मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध विद्यालयांचे सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करण्यात आले. प्रसंगी विविध प्रकारचे प्रकल्प विद्यार्थी आणि शिक्षकांनी सादर केले.

# बडोला शाळेतील वसतिगृहातील विद्यार्थ्यांना ब्लँकेट वाटप

प्रतिनिधी । वरखेडी, ता.पाचोरा



**श्रीमती पी.डी. बडोला माध्यमिक विद्यालयातील वसतिगृहातील (बोर्डिंग) विद्यार्थ्यांना भोकरीतील सामाजिक कार्यकर्ते हाजी जाफर हाजी इमाम यांच्याकडून ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.**

या कार्यक्रमात स्थानिक मान्यवरांची उपस्थिती लाभली, ज्याने विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी सामाजिक सहभाग दिसून आला. कार्यक्रमात भोकरीचे सरपंच अफसर शकूर काकर, वरखेडी गावाचे सरपंचपती चंद्रकांत प्रकाश पाटील, असलम काकर, जलील काकर, हमीर काकर, अकील हाजी अहम्मद काकर ट्रस्टी, भोकरी, शफी रुस्तम काकार, नबी काकर, अजीम हाजी काकर, मुसा मेहमूद काकर, जाफर काकर, अल्ताफ काकर हे उपस्थित होते. विद्यालयाकडून या सर्वांचा सत्कार करण्यात आला. बोर्डिंगच्या सर्व विद्यार्थ्यांना ब्लँकेट वाटप करण्यात आले, ज्यामुळे थंडीच्या हंगामात त्यांना दिलासा मिळाला. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका पी.एन. पाटील, पर्यवेक्षक सुर्वे उपस्थित होते. सूत्रसंचालन ए.एस. चव्हाण यांनी केले. तर आभार ज्येष्ठ शिक्षक एम. एन. कोळी यांनी मानले. हा उपक्रम सामाजिक दायित्व आणि शैक्षणिक सहकार्याचे उत्तम उदाहरण ठरला. ज्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे लक्ष देण्याचा संदेश दिला.

# स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त युनिव्हर्सल स्कूलमध्ये विविध कार्यक्रम

प्रतिनिधी । पारोळा

दरवर्षी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त दि.१२ जानेवारी रोजी विविध कार्यक्रमातून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानिमित्ताने आज शाळेत वकृत्व स्पर्धा व शुद्धलेखन स्पर्धा घेण्यात आल्या. मुख्य विषयः राजमाता जिजाऊ स्वराज्याची प्रेरणा, स्त्री शक्ती, महाराजांना घडविणारी माता, स्वामी विवेकानंद; युवा शक्ती, वेदांत, योग, राष्ट्रप्रेम, आत्म निर्भरतेचा या विषयावर विद्यार्थिनी भाषणे दिली. स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या वेशभूषेत शाळेत आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय पाटील यांनी केले. यशस्वीतेसाठी रोहित पाटील, शुभांगी पाटील, रोहिणी पाटील, कविता पाटील, मोना खत्री, खुशी दानेज यांचे सहकार्य लाभले.

## थोडक्यात

### भुमिअभिलेखतर्फे सर्वेक्षणास सुरुवात

**वरणगाव** । येथे भूमिअभिलेख विभागातर्फे नक्शा अंतर्गत शासकीय सर्वेक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत शहरी भूभागाचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण करणे. आधुनिक जीआयएस आधारीत डिजिटल नकाशांची निर्मिती करणे. नागरिकांना ऑनलाईन डिजिटल मिळकत पत्रिका उपलब्ध करून देऊन आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे, शासनाच्या इतर विभागांना विकासोपयोगी योजनांसाठी नकाशे पुरवणे. नागरिकांच्या नागरी हक्कांचे संरक्षण करणे. तरी सर्व नागरिकांना विनंती आहे की, सर्वेक्षणासाठी आलेल्या प्रतिनिधींना हक्क अभिलेख ७/१२, मंजूर रेखांकन नकाशा, खरेदी दस्त, मालमत्ता कर पावती, भाडेपट्टा करार, बांधकाम परवानगी आराखडा, बक्षीसपत्र, वसीयतनामा, मृत्यूपत्र, इच्छापत्र, हक्क त्यागपत्र, मुखत्यारपत्र, तडजोड नामा, विक्री करार, गहाण खत, वीज, पाणी, गॅस इत्यादी उपयोगिता देयके कब्जा प्रमाणपत्र, जमीन नोंदीचे फेरफार प्रमाणपत्रे, विभाजन पत्र, आदेशपत्र, नियमितीकरण दाखला, मंजूर नकाशे आदी कागदपत्र सादर करावे, असे आवाहन नगरपरिषद व भूमीअभिलेख विभाग यांनी केले आहे.

# लासुर विद्यालयाचे एलिमेंट्री परीक्षेत घवघवीत यश

## • सलग तिसऱ्या वर्षीही लागला शंभर टक्के निकाल

प्रतिनिधी । चोपडा

**एलिमेंट्री या चित्रकला परीक्षेचा नुकताच जाहीर झाला. यात लासुर येथील महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने यंदा देखील १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवत घवघवीत यश संपादन केले.**

लासुर येथील महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा चित्रकला परीक्षेत सलग तीन वर्षापासून शंभर टक्के निकाल लागत आहे. या २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात विद्यालयातर्फे चित्रकला परीक्षेच्या एलिमेंट्री परीक्षेत १९ विद्यार्थी बसले होते. त्यात ए ग्रेडने सात, बी ग्रेडने नऊ व सी ग्रेडने तीन विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

इंटरमिजिएट परीक्षेसाठी एकूण सोळा विद्यार्थी बसले होते. त्यामध्ये ए ग्रेडने एक, बी ग्रेडने आठ, सी ग्रेडने सात विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यासाठी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक जी.एस. सपकाळे व पी.डी. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे किसान विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अनिल पाटील, उपाध्यक्ष सुरेशचंद्र सुराणा, सचिव विक्रम माळी, मुख्याध्यापक आर.एस. पाटील, उपमुख्याध्यापक आर.एल. बाविस्कर, पर्यवेक्षक एस.जी. पाटील यांच्यासह सर्व यांच्यासह सर्व संचालक, शिक्षक, शिक्षकेत्तर आदींनी अभिनंदन केले आहे.

# संत रविदास सार्वजनिक सभागृहाच्या बांधकामास प्रारंभ

प्रतिनिधी । फेकरी, ता. भुसावळ

**महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभागांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना (०४) अंतर्गत मौजे फेकरी येथे संत रविदास सार्वजनिक सभागृहाच्या बांधकाम कामाचा शुभारंभ करण्यात आला. या विकासकामाचा प्रारंभ वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते करण्यात आला.**



सभागृहाचे बांधकाम दि.११ रोजी करण्यात आले. या कामासाठी अंदाजे १९ लाख ९५ हजार ४११ रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे. कामाची अंमलबजावणी संबंधित कंत्राटदार सोसायटीमार्फत करण्यात येणार आहे. कार्यक्रमास फेकरी सरपंच सौ. चेतना भिरूड, माजी सरपंच श्रीमती निर्मला निकम, सुनील बऱ्हाटे, सुनील भिरूड, संजय भिरुड, दिलीप पाटील, प्रशांत निकम, चिंतामण सोनवणे, महेश तांबे, विक्रम अहिरे, मिलिंद खंडारे, राजु साबळे, उल्हास बोरोले, मिलिंद सुरवाडे, राज किरण निकम, अशोक चिमणकर, अरुण निकम, करण निकम, संदीप निकम, पितांबर भटकर, गजानन चंदनकर, संतोष तायडे, गुणवंत भटकर, दिलीप तायडे, किशोर काकडे, मंगला सपकाळे, पंकज सपकाळे, शाखा अध्यक्ष अमोल सोनवणे, शाखा उपाध्यक्ष निखिल तायडे, सचिव समाधान चिमणकर, खजिनदार विनोद भटकर, डी. झेड. सपकाळे, दीपक सपकाळे, बाळू तायडे, राजेश निकम, मीनाक्षी सपकाळे, ज्योती चंदनकर उपस्थित होते.

# पिंपरूड येथे दिव्यांगांना साहित्य वाटप, पत्रकारांचा सन्मान

प्रतिनिधी । फैजपूर

**पिंपरूड येथे दिव्यांग व सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या (राहुल कोल्हे सामाजिक मित्र परिवार) वतीने दरवर्षीप्रमाणे राष्ट्रीय युवा दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात बाळशास्त्री जांभेकर, स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. या जयंती निमित्ताने पत्रकार बांधवांचा सन्मान तसेच अधिकारी यांना दिव्यांग मित्र म्हणून सन्मान रक्त तपासणी शिबीर घेऊन करण्यात आला.**

यावेळी अशोक कोळी, विनोद बिऱ्हाडे, कमल बेलसरे या दिव्यांग बांधवाना ब्लॅकेट, विष्णू साळवे यांना ड्रेस व ब्लॅकेट दिले. त्यांच्या मुलांना केयूर महाजन, मेहुल पाटील, ज्ञानेश्वर कोळी यांना स्कुल बॅग, ऑनलाईन रेशन कार्ड, सं.यो. मंजुरीचे पत्र दिले. तसेच सुवासिनी चौधरी यांनी भागवत कथेतील १८ अध्याय तोंडी वाचन केल्याबद्दल त्यांचा सुद्धा सन्मान करण्यात आला. यावेळी पत्रकार बांधव वासुदेव सरोदे, प्रा.राजेंद्र तायडे, उमाकांत पाटील, समीर तडवी, योगेश सोनवणे, फारुख शेख, सलीम पिंजारी, शाकिर मलिक, शेखर पटेल, संजय सराफ, राजू तडवी, मयूर मेढे, ईदू पिंजारी, अरुण होले या पत्रकार बंधूना सन्मानचिन्ह, मेडल, पेन व शाल देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आला. यावेळी यावल ग्रामीण रुग्णालयाचे आय. सी.टी. सी विभागप्रमुख वसंतकुमार संदानशिव, रवींद्र माळी, मिलिंद राणे यांनी रक्त तपासणी केली. पोलिस पाटील हरीश चौधरी, नितीन जंगले उपस्थित होते. जळगाव येथे राज्यस्तरीय दिव्यांग वधू-वर परिचय मेळावा आयोजित केली आहे. त्यासाठी राहुल कोल्हे ९४०५९१८५०३ व योगेश चौधरी ९३७३०८४००५ यांच्याकडे फार्म भरून जमा करावे, असे आवाहन केले आहे. सूत्रसंचालन संजय सराफ तर आभार संस्थेचे अध्यक्ष मुन्ना चौधरी यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मार्गदर्शक राहुल कोल्हे, उपाध्यक्ष चेतन तळेले, सचिव विशाल दांडगे, चिराग पाटील, पराग वारके, भगवान कोळी, सोनू कोळी यांनी परिश्रम घेतले.

# अमळनेरात मांजाने कापला एकाचा गळा

प्रतिनिधी । अमळनेर

**मुलीला शाळेत सोडायला जात असताना एकाचा गळा कापला गेल्याची घटना १४ रोजी सकाळी तांबेपुरा भागात नंदगाव रस्त्यावर घडली.**



महेश भीमराव पाटील (वय-४६, रा.रंजाणे) हे आपल्या मुलीला शाळेत सोडण्यासाठी येत असताना रस्त्यात त्यांच्या गळ्याला मांजाने कापले गेले. मात्र, त्यांना काहीच जाणवले नाही. मुलीने त्यांना तुमच्या गळयातून रक्त येत आहे, असे सांगितल्यानंतर ही घटना उघडकीस आली. दरम्यान, त्याचवेळी तेथे साफसफाई करण्यासाठी कर्मचाऱ्यांसह हजर असलेले आरोग्य निरीक्षक संतोष माणिक यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने नगरसेवक मुक्तार खाटीक याना बोलावले. तात्पुरता गळ्याला रुमाल बांधून ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आणले. डॉ.आशिष पाटील यांनी प्राथमिक उपचार करून गंभीर असल्याने खाजगी रुग्णालयात पाठवले. डॉ.संदीप जोशी यांनी तातडीने उपचार केले. जखम खोल होती मात्र वेळीच उपचार मिळाल्याने त्यांचे प्राण बचावले. दुर्दैवाने जर श्वास नलिका कापली गेली असती तर जागीच प्राण गेले असते.

पालकांनी पतंग उडवणाऱ्या आपल्या मुलांना आवर घातला पाहिजे तसेच नागरिकानी देखील सावधपणे सायकल अथवा मोटरसायकलवर प्रवास करावा. मांजा विकणाऱ्या दुकांदारावर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# श्रीमती प.क. कोटेचा महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगत

## मैदानी स्पर्धा व पदम आर्ट गॅलरीचेही थाटात उद्घाटन

प्रतिनिधी । भुसावळ

**येथील श्रीमती प.क. कोटेचा महाविद्यालयात आयोजित स्नेहसंमेलनानिमित्त सांस्कृतिक, क्रीडा व कला क्षेत्रातील विविध उपक्रमांनी महाविद्यालय परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. सकाळच्या सत्रात मैदानी स्पर्धा व पदम आर्ट गॅलरीचे उद्घाटन पार पडले. तर दुसऱ्या सत्रात रंगलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. सकाळच्या सत्रात स्थानिक क्रीडांगणावर आयोजित मैदानी स्पर्धांचे उद्घाटन राधेश्याम लाहोटी यांच्या हस्ते करण्यात आले.**

१०० मी. धावणे, गोळाफेक, भालाफेक अशा विविध क्रीडाप्रकारांचा या स्पर्धांमध्ये समावेश होता. महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने




सहभाग नोंदवला. खेळाडूंनी दाखवलेली जिद्द, शिस्त व क्रीडावृत्ती पाहन उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. विजेत्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. दुपारच्या सत्रात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन विना राधेश्याम लाहोटी (सदस्या) यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी मंचावर ममता जैन, प्रीती नहार, सीमा अग्रवाल, प्राचार्य डॉ.जीवन धांडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.वसंत खरे, स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. जे. व्ही. धनवीज, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा.एस.टी. गावंडे, स्नेहसंमेलन सचिव कु. धनश्री भालेराव, हितांशी दांडवेकर आदी मान्यवर उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात नटराज प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी एकल नृत्य व सामूहिक नृत्यांचे बहारदार सादरीकरण केले.

साऊथ इंडियन गीते, हिंदी चित्रपटातील लोकप्रिय गीते तसेच मराठी गीतांवर विद्यार्थिनींनी सादर केलेल्या नृत्यांनी कार्यक्रमात रंगत आणली. प्रेक्षक म्हणून उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांनी जल्लोष करत टाळ्यांच्या गजरात कलाकारांना प्रोत्साहन दिले. याच सत्रात गीतगायन स्पर्धा व फॅन्सी ड्रेस स्पर्धाही पार पडल्या. दोन्ही स्पर्धांना विद्यार्थिनींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध वेशभूषा, सादरीकरणातील आत्मविश्वास व कला कौशल्यामुळे कार्यक्रम अधिकच लक्षवेधी ठरला.

### ■ विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा म्हणून गॅलरीची स्थापना...

कार्यक्रमादरम्यान पदम आर्ट गॅलरीचे उद्घाटनही मान्यवरांच्याहस्ते करण्यात आले. या गॅलरीमध्ये चित्रकला, शिल्पकला व हस्तकलेचे सुंदर व सृजनशील नमुने प्रदर्शित करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा तसेच कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने गॅलरीची स्थापना करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

समारोपप्रसंगी मान्यवरांनी आपल्या भाषणातून क्रीडा, कला व संस्कृती या तिन्ही घटकांचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील महत्त्व अधोरेखित केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता व संघभावना वाढीस लागते, असे मत त्यांनी व्यक्त केले.